
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. १६३६



# अपर्णा

REFBK-0012707
REFBK-0012707

૩૯૩૯૯
૧૨/૧૧/૫૮
અં.૨૧૮.
૩૦૫

# अपर्णा

शिवाजी गऊळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... दि: ......
क्रमांक ...... नों. दि. ......

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. १२७०७
ठाणे (स्थळ प्रत)

REFBK-0012707
REFBK-0012707

मूल्य : रुपये २·००

मराठवाडा साहित्य परिषद

मराठवाडा साहित्य परिषद् प्रकाशन

प्रकाशक :

मराठवाडा साहित्य परिषद्
औरंगपुरा, औरंगाबाद.

सर्व हक्क स्वाधीन
मराठवाडा साहित्य परिषद्

१९६१-१९६२

मूल्य : दोन रुपये

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस
सराफा, औरंगाबाद.

कै. अण्णांच्या स्मृतीस –

नवोदित लेखकांच्या आणि कवींच्या विकासक्षम साहित्य निर्मितीला वाव देण्याचें मराठवाडा साहित्य परिषदेचें धोरण हें सर्वश्रुत आहेच. यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेने 'पुरस्कृत ग्रंथ प्रकाशना'ची जी योजना हातीं घेतली आहे तिच्यांतील हें पांचवें प्रकाशन.

श्री. शिवाजी गऊळकर हे अपेक्षा निर्माण करणारे मराठवाड्यांतील नवोदित कवि. त्यांच्या कवितांचा हा संग्रह पुस्तक रूपाने प्रथमच रसिकांसमोर येत आहे. रसिकांना त्यांची ही काव्यसेवा मान्य होईल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत कविता संग्रह प्रकाशित करण्याच्या कामांत ज्यांचें ज्यांचें सहकार्य लाभलें त्या सर्वांची परिषद आभारी आहे.

**न. शे. पोहनेरकर**
अध्यक्ष
मराठवाडा साहित्य परिषद्

# चार शब्द

ज्यांच्या जीवनाचें काय होईल हें समजत नाहीं, आणि कांहीहि झालेलें असलें तरी तें टिकेल ह्याची खात्री देतां येत नाही असें गऊळकरांचें जीवन आहे. त्यांच्या माझ्या परिचयाला आज दहा वर्षें उलटून गेलीं आहेत, पण हा माणूस असा आहे असें निश्चित मत त्याच्याविषयीं अजून मला बनवतां आलेलें नाही. ज्या वेळीं त्यांचा माझा परिचय झाला त्या वेळीं बहुधा ते इंटर असावेत. अत्यंत भावनाप्रधान, संवेदनाक्षम, एकान्तिक, हट्टी असा तरुण ह्या वेषांत ते त्या वेळीं माझ्यापुढे होते. त्याचें पुढे काय होणार अशी थोडीशी काळजीहि मला वाटत होती. अत्यंत अबोल असणारा असा हा माणूस ह्याला कांहीहि समजावून सांगण्याची शक्यता नसे. सांगूं लागलों, तर हा गप्प बसून ऐके. पण ध्वनीच्या लाटा ह्याच्या कानांवर आदळून वाऱ्यावर विरत आहेत. कोणत्या तरी विचारांच्या गुंगींत हा गुंगला आहे आणि आपलें सारें बोलणें वाया जात आहे असें वाटे. जीवनाचा खूपच कटु अनुभव त्यानें चाखलेला होता. अगदी क्वचित् पण एखादा, दुसरा शब्द हा बोले, त्यालाहि जहरी कडवटपणाचा वास असावयाचाच. अशीं माणसें पाहिलीं म्हणजे मी अस्वस्थ होतों. ह्यांच्या जीवनाची गाडी रुळावरून घसरलेली असते. तीव्र बुद्धि असल्यामुळेच की काय हीं माणसें कांहीहि विसरूं शकत नाहीत. कडवटपणा हा ह्यांच्या हताश पराभूततेचें प्रतीक असतो. आणि ह्यामुळे

पुन्हा रुळावर येण्यासाठी जो दमदार चिवटपणा लागतो त्याची ह्यांच्यापासून अपेक्षा करतां येत नाही. आपण मनांतल्या मनांत चुकचुकूं शकतों, तेंहि उघड करण्याची भीति असते कारण ह्या मानी व्यक्तींना सहानुभूति दाखविणारा आपला प्रथम शत्रू वाटतो. पण जिद्दीने गऊळकर पुन्हा ताठ उभे राहिले. मार्क्सवाद हें त्यांचें त्या वेळचें बरेंच आवडतें तत्त्वज्ञान. त्याच परिभाषेंत सांगायचें तर चक्राकार नागमोडी वळणें घेत पण जिद्दीने ते वर चढले. इंटरनंतर त्यांनी बी. एस्‌सी. होण्यास हरकत नव्हती, पण ते बी. ए. झाले. त्यानंतर एम्. ए. सोडून सायन्सचे पदवीधर झाले. पण पुन्हा मराठीचे एम्. ए. झाले. लेबोरेटरीचें काम करतांना तो कविता करी, आणि मराठीच्या एम्. ए. चा अभ्यास करतांना नव्या साधनांनी प्रयोगशाळा सुसज्ज करण्याची योजना आंखून ती तो पार पाडी. मधेच त्याला अध्यात्माचा जबरदस्त खोकला आला होता. त्यामुळे कधी इतिहास, तर कधी व्याकारण, कधी मार्क्स, तर कधी फ्रॉइड, कधी उमर खय्याम, तर कधी शंकराचार्य असें सारखें परपस्परविरोधी टोकांना आंदोलनें घेत त्याचें वैचारिक भ्रमण चालूं होतें. ह्या साऱ्या भ्रमणांना वादळाचा वेग होता, त्या त्या वळणांवर धर्मयुद्धाचा हेकट आवेश होता, पण उभ्या असलेल्या स्थळावर त्याची पतिव्रतेची निष्ठा होती. जेव्हा तो मार्क्सवादी झाला त्या वेळीं त्या विचाराचें त्याने कसून अध्ययन केलें. पुढे जेव्हा अध्यात्माचा झटका आला त्या वेळीं उपोषणें, कांदा आदि पदार्थ वर्ज करणें, योगासनें ह्यांचा क्रम चालूं होता. सतत टिकलेली एकच गोष्ट त्याची सांगण्याजोगी आहे ती म्हणजे ज्या वेळीं जें चालूं असेल त्याचें कसून अध्ययन होत असायचें. इतरांना बुचकळ्यांत पाडणारे अनेक संकेत त्याच्या कवितेंत गर्दी करून जमले आहेत ह्याचें कारण असें आहे. व्यक्तीचा हा परिचय करून देणें मला ह्यासाठीं आवश्यक वाटलें की, त्याखेरीज त्याची कविता इतकी आग्रही, इतकी कटु कां झाली, हें समजणें इतरांना कठीण आहे.

कवि हा भावनाप्रधान असला पाहिजे, संवेदनाक्षम असला पाहिजे, ही भूमिका सर्वमान्य आहे, पण तो पुरेसा निगरगट्ट असला पाहिजे,

थोडासा निर्लज्जहि असला पाहिजे, थोडासा ढोंगीहि असला पाहिजे ह्याखेरीज कविता जमणार नाही हें आपण विसरूं लागलों आहोंत. गऊळ-करांच्या कवितेंतील बहुतेक सारे दोष ह्या विस्मरणांतून निर्माण झालेले आहेत. विचार आणि भावना ह्यांतील फरक पुरेशा प्रमाणांत आपण जरी ओळखला तरी मन हा समुच्चयाने वागणारा शरीराचा भाग आहे, हें नाकारतां येत नाही. विचार करकरून आपण ज्या भूमिकेवर येऊन टेकतों त्या वैचारिक टप्प्याचा साऱ्या भावनेवर खरें म्हणजे अनुभव-विश्वावरच ठसा असतो. आणि म्हणून कवि हा स्वतःच्या वैचारिक निष्ठेपासून थोडा अलग असला पाहिजे. त्याला विचार असावेत, वैचारिक निष्ठा असल्या म्हणजे कवितेला फार त्रास होतो. गऊळकर वाचतांना हें पुनः पुन्हा जाणवतें की कवि होण्यासाठी जेवढ्या प्रमाणिकपणाची आवश्यकता आहे त्यापेक्षा सदैव अधिक प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न हा माणूस सतत करतो. वैचारिक निष्ठा एक तराजू उपलब्ध करून देतात ज्यांत मग सारें कांही मोजतां येतें आणि जेव्हा सारें कांही एका तराजूंत मोजलें जातें, तेव्हा टमाट्यांचा रसरशीत लालपणा आणि कांद्यांचा पापुद्र्यांनी बनणारा देह दुर्लक्षित होतो. सारें कांही भाजी ह्या एका वर्गांत समाविष्ट होते तसें पाहिलें तर अशाश्वताची आणि क्षुद्रपणाची विकल जाणीव करून देणें हाच केव्हाहि शुद्ध विचाराचा परिणाम असणार. पृथ्वी ही अडीच अब्ज वर्षांपूर्वी बनलेली असो अगर त्यापेक्षा थोडीफार कमी–अधिक असो, साठ कोटी वर्षांनंतर असो, अगर नव्वद कोटी वर्षांनंतर असो, एक दिवस ही पृथ्वी संपणार आहे. कदाचित् त्या आधी फार तर उशिरा म्हणजे त्या वेळीं माणसाची जात संपून जाईल, ज्याला आपण मोठ्या गौरवाने मानवी संस्कृति म्हणतो तो या विश्वाच्या प्रचंड घडामोडींत अपघाताने बनलेला विनाशी असा एक पसारा आहे. आणि एकूण मानवजातीचा विचार न करतां स्वतःपुरता विचार करायचा म्हणजे तर सारेंच संपलें. फार तर एखादें शतक आपला येथला रहिवास. पुनर्जन्मावर श्रद्धा ठेवण्यासाठी आत्मा गृहीत धरावा लागतो जो विज्ञा-नाने असिद्ध आहे. शेवटीं काही तरी करण्यासाठी जी धडपड आपण

करतों तिचा इत्यर्थ शेवटीं विनाश हाच आहे. माणूस खरें बोलला काय अगर खोटें बोलला काय, दररोज पोटभर जेवला काय आणि उपाशी राहिला काय साऱ्यांचा शेवटीं मृत्यूच. मरण हें जर अटळ असेल आणि तें जर कोणत्याहि क्षणीं येणें शक्य असेल तर मग मृत्यूच्या कारणाची चर्चा विफल नाही काय्? ह्या जीव–सृष्टींत खालच्या टप्प्यावर असे अनेक गट आहेत जेथे नर आणि मादी हा फरकच नाही, आणि जेथे हा फरक आहे त्याचा हेतु केवळ वंशसातत्याचा आहे. निसर्गाचा कांही असा नियम नाही कीं, स्त्री–पुरुष संयोग स्वेच्छामय आनंदमय असला तरच वंशसातत्य टिकावें. निसर्गाचा संबंध स्त्री पुरुषांना बीजसंमेलन करविण्याला भाग पाडावें इतकाच आहे. मानसिक इच्छा–अनिच्छा निसर्गाला गौण वाटतात, तर मग ह्या प्रचंड प्रक्रियेंत प्रेम ह्या शब्दाला कांही अर्थ उरतो काय? शृंगार हा कामवासनेच्या व्यवहाराचा केवळ बोधक मानवी शब्द नाही काय? आणि ह्या साऱ्या व्यवहारांत आपलें स्वातंत्र्य तरी किती? निसर्ग जन्मवितो, आपण जगतों, निसर्ग तरुण करतो, भावना–वासना उद्‌भवितो, आपण त्यांना अनुसरतों, ह्यांत माझ्या कर्तृत्वाचा भाग किती? समाज बदलणार–सामाजिक नियम अनुसरत, मी प्रेम करणार निसर्गाने भाग पाडले म्हणून. प्रेयसीचा सलज्ज हुंकार तिलाहि निसर्ग भाग पाडतो म्हणूनच नाही काय? शरीराने दुबळा, कृतीने परतंत्र, बुद्धीने परप्रत्ययनेय, विनाशी असा एक क्षुद्र म्हणजे मी. ही सारी विफलतेची गाथा आहे, हें मान्य करूनहि तें कटु सत्य आहे ह्याला काय इलाज? ह्या पार्श्वभूमीवर संस्कृतीचा व्यवहार चाललेला असतो. ही पार्श्वभूमि विसरतां तर येत नाही, पण ती क्षणकाल विसरणें भाग आहे, त्याखेरीज क्षणाक्षणाला उमलणारें सौंदर्य पाहतां येत नाही. फुलें हा वनस्पतिसृष्टीचा जीवशास्त्रीय सातत्याचा आविष्कार आहे, हें खोटें नाही पण तें विसरून, फुलांचा विनाशीपणा विसरून, त्याच्या प्रत्येक पाकळीचें सौंदर्य पाहिलें पाहिजे. गऊळकर विशाल पार्श्वभूमीशीं इतकें प्रामाणिक राहतात कीं मग कटुता आणि वैफल्य, वैताग आणि चीड ह्या चक्राच्या बाहेर येऊन

प्रत्येक लाजलेल्या आरक्त चेहऱ्याचें प्रत्येक स्पंदन संदर्भातून काढून टिपणें त्यांना कठीण होतें. कवि हा थोडा दु:खाला निबर असावा लागतो. विशाल विश्वव्यापी व्यथेचें त्याने दर्शन घ्यावें पण ह्या दर्शनाचा हेतु स्वतः विकल होणें हा नसून इतरांना ह्या भव्य भीतीचें तटस्थपणें दर्शन घडवणें हा असतो. आणि ही सारी पार्श्वभूमि विसरून जाऊन प्रत्येक क्षणाची वेगळीक जपण्याला कवीला तयार व्हावें लागतें. पण ज्यांच्या वैचारिक निष्ठा तीव्र आहेत, जे व्यापक पार्श्वभूमीशीं अतिप्रामाणिक आहेत त्यांना हें कसें जमावें ? हा खरा प्रश्न आहे.

गऊळकरांची कविता अजूनहि बनत आहे, घडत आहे. तिच्या शरीरावर ह्या अवस्थेची कोंवळीक आहे. माणसाचें पिल्लू तरुण झालें म्हणजे देखणें वाटतें पण कोंवळें अजाण असलें तर त्याचें दर्शन निरागस आनंद देतें. कवितेचें असें नाही. कोंवळिकेच्या अवस्थेंत ती अधिक टोंचणारी होते, गऊळकरांची कविता आज तरी अशी टोंचणारी आहे. हें टोंचणें आणि अन्तःकरणाला भिडणें एक नव्हे. परिपक्व कविता मनाला भिडते पण टोंचत नाही. गऊळकरांची कविता मनाला भिडते पण टोंचतेहि. हें तिचें टोंचणें रसिकाच्या आशयाशीं समरस होण्यांत अंतराय करतें. पण आरंभीं हें असें व्हायचेंच. कोणत्याहि कवीच्या आरंभावस्थेंत इतरांचे ठसे उमटलेले दिसणें स्वाभाविक आहे. आजच्या नवकवींतील अतिरथी-महारथींच्या चाकाचा वण गऊळकरांच्या कवितेवर उमटलेला दिसतो. पण त्याबद्दल तक्रार करण्याचें कारण नाही. जेव्हां कविता तरुण होते तिचे सारे अवयव पुष्ट होतात त्या वेळीं अनावश्यक वण पुसले जातात आणि आवश्यक वण कविता पचवते. कुठे दिसले तर तेहि अलंकारवत् शोभायमान होतात. कोणत्याहि कवीच्या बाबतींत प्रथमावस्थेंत विचार करायचा असतो तो त्याच्या ठिकाणीं असणाऱ्या विकास-क्षमतेचा. गऊळकर आतां जीवनांत स्थिरावले आहेत. सर्व सौंदर्यानिशीं त्यांची कविता येथून विकसित होईल ह्याविषयीं मला शंका नाही. आणि विकासाची सामर्थ्याची प्रचंड क्षमता ह्या कवींत आहे ह्याविषयीं तर मी पूर्ण निःशंक आहे.

वस्तुतः एखाद्या कवीच्या काव्यसंग्रहाला शोभेल अशी प्रस्तावना लिहावी हें घडणें माझ्याकडून कठीण होतें, पण त्यांचे माझे संबंध असे की त्यांची आज्ञा मोडणें मला शक्य नव्हतें म्हणून हे चार शब्द लिहिले आहेत. काव्यप्रेमी सज्जनांनी ह्या अतिप्रसंगाबद्दल उदारमनाने क्षमा केली पाहिजे.

– सुरेंद्र बारलिंगे

कविता वाचकांच्या हातीं देतांना साशंकता वाटावी यांत आश्चर्य नाही. त्याचप्रमाणे वाचकांच्या समोर कविता संग्रहरूपाने यावी असें वाटावें यांतहि कांही आश्चर्य नाही. इच्छा आणि साशंकता यांच्या समन्वयांतून हा संग्रह बाहेर पडत आहे. याचें उचित मोजमाप रसिक करतीलच.

हा संग्रह प्रकाशित करण्यांत सर्वश्री नरहर कुरुंदकर, तु. शं. कुळकर्णी व सदाशिव कहाळेकर यांनी जी आस्था दाखविली त्याबद्दल त्यांचे आभार मानण्याची गरज नाही पण औपचारिकरित्या त्यांचे आभार मानतो.

मराठवाडा साहित्य परिषदेने हा संग्रह प्रकाशित करण्यासाठी घेतुला याबद्दल परिषदेचे अभार मानण्यास शब्द पुरे पडणार नाहीत.

सदर संग्रहाला प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांचा मी ऋणी आहे.

**—शिवाजी गऊळकर**

पत्रावरती चुरगळलेल्या
डुक्करली मी जेव्हा कविता
शिडबिडलेल्या शब्दमुखांतुन
'चीं चीं' तेव्हा अर्थ निघाला!

मृण्मय कसली मांसल वस्त्रें
खुराड्यांत जे नेसुन फिरतीं
नसे लोपली जरि भंगुरता
कैवल्या जें स्वप्नीं बघती–
चीं चींत तसें गूढा बघतों
शब्दामधुनी अर्था काढुन
गुंजन कोठे रंजन कांहीं
आहे कां तें बघतों धुंडुन.

१३–११–५३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 92606.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36.362...... वि: काव्य
क्रमांक 9632........ नों: दि: 12-11-55

रुधिरतृषा शमवून
संहाराने श्रांत होऊन
क्षुधाक्रांते! तव नेत्र झाले बंद
कर्णीं न ये गगनविदारक कठोर ध्वनि
ज्वालामुखिरव,
थंड प्रभंजन तुझेंच स्पंदन
मुकुटावरचीं उल्कारत्नें निखळूं लागलीं
चोरी जातो बघ धूमकेतू
अथाह अज्ञात शून्यामध्ये दूर
नेत्रांतिल ज्वलित कटाक्ष
ग्रासून टाकिती मेघांच्या माला

हे शुंभनिशुंभ दानव जमले सावध होऊन
दानवतेने कुंभ भरती पापाचा
प्रकृतीने तया
ओतले भूवर
कृष्णवर्णी झाली दुग्धमयी निशा
निशाचर मग
मारी मानवता घनांध तिमिरीं
पळता पळता शिंपिलें त्याने त्या प्राच्यदिशेवर

लाल निळें रक्त !
हे घोर कालिके
सुर हतप्रभ होउन बसले
प्रलय मांडितो हा क्रूर दानव
तुज आवाहन;
स्वीकार आव्हान !
रुंडमालिका घाल गळीं
परिधान कर नर–चर्म–वस्त्र
आरोळी ठोकून प्रशांत सागरीं
उठव प्रमत्त ऊर्मि
चूर्ण कर उत्तुंग शैलाग्रें
विझव रात्रदीप
संपव आजची ही भव्य दाहक
भयाण निरामय शांति
ध्वंस करुनि हा महाविश्वकोष
उरले सुरले सिंहासनोन्मत्त
छिन्नभिन्न कर तूं त्यांना
आणिक पुनरपि
तें संहार–नृत्य, भीषण तांडव !
भडकुं दे पुन्हा तुझी रक्ततृष्णा
आलापि माते

तें संहारगान
अमूर्त स्वप्नें मूर्त होतील
संहार श्रांत क्षुधाक्रांते
बंद कर पुनरपि तव नेत्र.

२६-९-५२

भूतामाजी केवळ गोंधळ
गेलों पळून इथुनी लपून
टांच मारुनी पुढच्या तिमिरा
बघती डोळे भाषा फाडुन

डिओजेन्सच्या सिनिक्पणाला
निद्रेमधल्या स्वप्नि गोठुनी
रूपलुब्धता नार्सिससाची
घेतलीच मी अंगि बाणुनी

भिंगामाजी नील नभीच्या
दृष्टि रोखुन, ओढुन दुलई
बुटका बनुनी दीड वितीचा
फिरेन आता तेजोवलयी

मार्गावरुनी इंद्रधनूच्या
मेघासंगे जाऊन लचकत
विलीन होता सान्तामध्ये
भूतभविष्यहि फिरतिल धुंदित

६–१–'५३

रक्त आजचें मत्कुण शोषी
मत्तपणा पण उद्याच करिता
दडेल कोठे आदिमाय मग
अंगीं भिनता भार्गव—भक्ती ?

संन्यासी मी असे त्रिदंडी
बराच उपवर भावहि माझा
माझ्यासंगे गाइ विराणी
सखी योगिनी एक नग्निका

त्रिपुटविरती विजयी होण्या
त्रिविध तापहि हरण्यासाठी
तिच्यासह मी करीन तीर्थें
तिर्यग्योनित जन्म घेउनी !

पश्यंती मम परा न वाणी
मध्यमाहि ना, नसे वैखरी
मनाक मननानंतर वदतो
'मनःपूतं समाचरेत्' मी.

२१–१–५३

बंदर बसला बदरीवरती
बद्धकोष्ठि जरि खातच बदरा
बहिर्व्यसनि कुणि बसला गातच
एक बहिष्कृत बहिर्लापिका

बुडतो नाविक, तर्कट तरतो
तपनि कुणी अन् फुकाच तपतो
व्यर्थाचि वासव जीभ पाघळे
पाणी वाहत पुच्छ हालवुन

गाढ तमाच्या पाटीवरती
प्रकाश झोते लेख रेखिले
ते तर जाती क्षणांत विरुनी
मागे उरला श्वान भुंकता

बसुनी घुमशी काय वार्तिका
काळाच्या या दरडीवरती
विकर्षुनी अन् माझी अक्कल
घोरत पडला दांभिक प्रीती

१६–१–'५३

इथे जिथे अन् त्याच तिथेचा
मीनाबजार इथे सापडे
जिथे स्वतःला काम विसरणें
किंवा अपुल्या 'मी' त मनाला
तिथे जरासें बरें रिझविणें!

अवचित तेथिल वदे किनारा
'सावधान रे' काळाआडुन
समर्थ आहो आम्ही ही पण
घ्याया त्याचें तेजोदर्शन

एक पुढे तर दोन मागुती
मानवतेची नव्या दमाची
अशीं पाउलें, तरीहि गाठूं
ध्येय; युगाची चाल आमुची

५-१२-५३

जीवनाकांक्षा मानवाची
उध्वस्त होऊन तमाच्या लोळांत
झोपून गेली आकाशाच्या छिद्रान्वित घोंगडीखाली !

ऐशा कोणे एके समयीं
अर्जुन शिकतो धनुर्विद्येचे धडे द्रोणापाशीं;
सुखदु:खाचीं वलयें ज्याच्या वर्तुलाकार
अंत:केंद्राभोवतीं फिरतो जो भोवरा गरगरा
आंत बैसला तो नेणीवेंतला मध्यबिंदू
छेदण्या तया छोडितो धनुकली
चष्मेवाला पार्थ
लक्ष त्याचें नच मध्यावर
चष्मा दावी अनंत ब्रह्मांड तयास
विश्वात्म्याची अगाध लीला—

“ भूतकाळ गेला पळून
भांडल्या रांडेला बघून जैसा पळतो बायल्या
उघडा नग्न वेंगाडीत दंतहीन आपुलें मुख
शरीर झाकण्याची शुद्धहि गेली सोडून
विकृत घृणास्पद दीर्घ द्वेषाचा धगधगीत
निखारा चेतवून, फुलवून

इथे जिथे अन् त्याच तिथेचा
मीनाबजार इथे सापडे
जिथे स्वतःला काम विसरणें
किंवा अपुल्या 'मी 'त मनाला
तिथे जरासें बरें रिझविणें!

अवचित तेथिल वदे किनारा
'सावधान रे' काळाआडुन
समर्थ आहो आम्ही ही पण
घ्याया त्याचें तेजोदर्शन

एक पुढे तर दोन मागुती
मानवतेची नव्या दमाची
अशीं पाउलें, तरीहि गाठूं
ध्येय; युगाची चाल आमुची

५-१२-५३

जीवनाकांक्षा मानवाची
उध्वस्त होऊन तमाच्या लोळांत
झोपून गेली आकाशाच्या छिद्रान्वित घोंगडीखाली !

ऐशा कोणे एके समयीं
अर्जुन शिकतो धनुर्विद्येचे धडे द्रोणापाशीं;
सुखदु:खाचीं वलयें ज्याच्या वर्तुलाकार
अंत:केंद्राभोवती फिरतो जो भोवरा गरगरा
आंत बैसला तो नेणीवेंतला मध्यबिंदू
छेदण्या तया छेडितो धनुकली
चष्मेवाला पार्थ
लक्ष त्याचें नच मध्यावर
चष्मा दावी अनंत ब्रह्मांड तयास
विश्वात्म्याची अगाध लीला—

“ भूतकाळ गेला पळून
भांडल्या रांडेला बचून जैसा पळतो बायल्या
उघडा नग्न वेंगाडीत दंतहीन आपुलें मुख
शरीर झाकण्याची शुद्धहि गेली सोडून
विकृत घृणास्पद दीर्घ द्वेषाचा धगधगीत
निखारा चेतवून, फुलवून

गेला! पळून गेला!!

युगाधीशाच्या ऐटीने पळल्याच्या पाठी लागून
वर्तमान येतो बोंबा ठोकीत
मर्मांवरती बोटें ठेवतो गतकालाच्या
चिरफाड करितो वस्त्रांची त्याच्या
स्वतः भोवती गुंडाळून घेतो रग
खोटीं नाणीं चालवितो माध्याह्नी
झाकितो आपुली बिंगें–

*'सुखाशांच्या भग्नावशेषांवर*
*नग्न भुकेकंगालांच्या*
*झोपड्या उभाविणें,*
*पिळवटणाऱ्या उदरीच्या आंतड्यांनी*
*उरींची शुष्कस्तनें आवळून दुग्ध काढणें,*
*दुःखाग्नीने होरपळलेली अश्रुवेली*
*सुखाच्या कल्पनेने जिती करणें,*
*दीड वितीच्या खळग्यांत श्रमबिंदू सांठवून*
*त्यांतच नाक धरून बुडून मरणें,*
*धमन्यांतील रक्त आटतांच*
*अस्थींची बॅट, कवटीचा बॉल करून*
*त्रितापांच्या त्रिफळा उडविणें'*

बाल–तरुण–वृद्ध, स्त्री–पुरुष

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५४३५५ वि: काव्य
क्रमांक ९५३५ नों दि: २२-२-७८

पशु, पक्षी
सगळ्यांचे मिक्श्चर दोन आणे छटाक
देतो वास्तवतेच्या प्लेटींत
वळवळणारे जीव दिसतात ओंगळ
येते शिसारी

पण दिसतो 'मी' हि प्लेटींतलाच !
पाण्यांत राहून माशांशीं वैर करून
ठिकऱ्या उडवितों अन्यायाच्या
उडती ठिकऱ्या पण माझ्याच
अशक्त उराच्या सांपळ्यांतून
उमटेना आवाज
दु:खातिरेकाने टाकतां मान खाली
वर्तमान कदम उचलून गेला पळून !

भविष्य येतो, येणारच !
येतो नित्यचक्री वाजवीत शिट्टी,
अनुभवांचीं खांडोळीं दावितात हिरवे लाल कंदील
ज्ञाता करितो क्लीनिंग लाइनची
कुणी शिजवितो शिळ्या चितेवर उद्याचें अन्न
कुणाला भ्रांत आताची.
गर्भाशयींच्या स्वप्निल आशांचें बीज

शक्याशक्यतेच्या दाट कुबट धुक्यांत अंकुरतात,
भिकारड्यांच्या वस्त्रासम हा जीर्णकाल
झाकितो भविष्याचें अंग;
परंतु त्याच्या ज्वानीची दिसते कांती उठून
जसें नीळ कासारीं खुलतें नीलकमल !"
—लक्ष चळलें बघून हासडी दोन शिव्या
पार्थाचा गुरु द्रोण,
घाबरून पुसतो चाळिशी धनुर्धारी;
भ्रम हरला गुरुकृपेने, दिसलें लक्ष्य केंद्रीचें
गाढ तमाची हटतां झापड
सुटली मर्मभेदी तीक्ष्ण शरावली
नेम चुकला............चापहि गळाला करीचा
आचार्यांचे डोळे लाजून थिजून गेले
लक्ष्य दाविलें परि तो द्रोणमंडुक
केंद्रबिंदूचें गुह्यज्ञान वदूं न शकला !
निघाली अर्जुनाची स्वारी
ज्ञानाच्या शोधार्थ
कृष्णनिशेच्या अधिराज्यांत
ओरडत 'कृष्णा ! कृष्णा !! कृष्णा !!!'

२६–१२–५३

आम्हासी न ठावे भक्ति देणार तू ही न मुक्ति
जगण्याची परि सक्ति जगीं तुझ्या.

गतजन्मीं केली भक्ति काष्ठ अंगीं कामासक्ति
अहंताचे हातीं शक्ति दानवाची.

महंत जाणें विरक्ति भूतवस्ती त्याच्या चित्तीं
आमुची इमानी वृत्ति तुज ठावे.

पिसाटा अंगींहि मस्ती राखितसे मत्त हत्ती
कोण करावी प्रशस्ती कुणाची गा.

घडद्रोणांत निःशक्ति प्रेतमुखीं वाक्शक्ति
कां आम्हीच झालें व्यक्ति व्यवहारी.

२६-५-५३

बुरसटलेल्या सृष्टीमधलें
वळवळणारें सीमित जीवन
कोळपलेल्या स्वप्नफुलांना
अश्रुजलामधि भिजवित,
बघून रडतो अरवन पर्वत
अवाढव्य ती भिंत एकली
दैवाला पण लावित बोल
कौल पाहते!

जीवन गातच स्तवन मृत्युचें
करिते पूजा अमरत्वाची
प्रसाद चाखुन धुंदित फिरते
अश्वत्थामा दरीकपारीं,
नदीकिनारी....मुसळ पाहण्या
आणिक गाते :
"विश्वामधलें द्वंद्वछंद हे
अनुभवगम्य न, सापेक्षच जर
नचिकेताचा बाप बनोनी
अभिलाषांचें दान करा तर!"
जगांत विस्तरणारें सत्य
पूर्णात्म्याची दाउन लीला

संसाराला मोल आणितें
कार्यच पाहुन कारणरूपी
आदिकारण निसटुन जातें;
धडपडणारें अपूर्ण जीवन
सृष्टीमधलें बुरसटलेल्या
बघून रडतो अरवन पर्वत
कोळपलेल्या स्वप्न–फुलांना
अश्रुजलामधि उबवित!

२१–६–५३

दीप जीवन वादळी
गीत अधूरें कपाळीं
उदासीनतेची छाया
ओल्या नेत्रीं अश्रू ढाळी

रात्र उदास भिजता
मना तिमिर फाडितो
चालू असून प्रवास
इथे किनारा भासतो.

१३–३–५४

-११-

तुला न ठावें माझा पत्ता
दृष्टि तुझी अन् अंध जाहली
सुखांत लोळत, दुःखीं पिचतों
काय तुला गे पर्वा त्याची
विसरुन गेलिस
अफाट साऱ्या धंद्यामाजीं !

अमाप ताऱ्यांमधुनी एक
गळला जर कां संकेतास्तव
आणि म्हणाला 'कुठे असे मी ?'
चौथ्या केबिनमधला दांडा
कशास वदतो त्याचा पत्ता;
येउन गाडी जाइल कोठे
काय असे त्या सिग्नलवाल्या
आदर्शांचा पीत हिवाळा
दगडांची का ढळे पापणी !
नव्यानुभूति मृगजल ठरल्या
कशास गाऊं तुला लावणी
विसरलीस जर माझा पत्ता
धुरकट सगळ्या गर्दीमाजीं !

४-८-५४

रे रडतांना मी घनतम धरितों ताल
भिजविते रात्रही अपुले शामल गाल
घुसतो क्रंदनशर शांतीच्या जव हृदयीं
ठिबकतो शोक हा भिजवित धरती-भाल.

हे युगयुग गेले क्रमितां पथ तुज भवती
परि मीलनआशा मनास नित्यचि खाती
कां अपूर्ण राहिल होम प्रीतिचा सखया
नी घटांत मधुच्या मिळेल कां रे माती?

तव प्रेमास्तव मी जीवन सिंचित केलें
सुकोमल पदतलीं भावचि अर्पण केले
रे जरि शब्द प्रीतिचा तुवा न ऐकवला
लखलखाटलें मन अंधारा जव प्यालें!

२७-८-५४

-१३-

आज अविद्या नष्ट जाहली
क्षणांत फिटलें ऋण वाणीचें
शब्द सांडले, आस गळाली
अवचित घडता तूरपर्वतीं
तेजोदर्शन !
परी न सुटला मोहबंध
मुक्तिज्ञानहि पाश जाहलें
सत्त्वगुणाच्या क्रूसावरती
शरीर नटलें–
तेंहि पाहिलें !
आणि ऐकली अमर शिकवण
कन्फ्यूशसची, कृष्णाची
येशूची अन् महंमदाची
सर्वांची कीं–
थयथयणारी ओठांवरती
ग्रंथामध्ये सडणारी !

विमुक्ततेचें सौख्य चाखण्या
अनृणि होण्या
उधळिलेली रत्नमालिका

कुणी धुंडितो मातीमध्ये;
कालपक्षी तर उडून गेला
जखम चाटितो जीव राहिला
फुंकर घाली ज्ञाननशेची
एकेरी ती स्वर्ग–हवा !

एकेरी ती स्वर्गहवा
धुंदिल नयनां आतुर करतें
पुनरपि घेण्या तूरपर्वतीं
जळणारें तें तेजोदर्शन !

७–१०–५४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८३८९ वि: काव्य
स्थान १०४५ नों दि: १२-१२-८४

तमांस दिसतें अज्ञानाच्या
ज्ञानाची जव दिवटी येथे
स्मरण संभवत विस्मरणीं तव
मृत्यु देखिला काय जीवनीं ?

कुणी प्रमाता, प्रमेय आणिक
प्रमाण सारें कार्य पाहिलें
कारणास नी सत्य मानुनी
कार्यावरती ढेकुळ रचलें !

स्वप्न पाहण्या जागे होउन
डोळे वासुन बघतो अजुनी
जिवंत राहुन नर्ककल्पना
करण्यामध्ये भयाण झुरणी

समतेमध्ये अशी विषमता
असती तर हें साम्य लोपतें
द्वंद्वामधलें एकी एक
मूलतत्त्वहि असेंच लपतें.

१३–१–५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
92606

कृष्ण म्हणतो :
अमरत्वाचा वंशज मानव
हृदयांत त्याच्या प्रेमसुधा–
मरणाऱ्या भीष्माच्या
तोंडीं जल टाकून
कुण्या गंगेत धुशील
पार्था ! पाप स्वार्थाचें ?

इथे निर्जीव लंबक
हलतो मापीत काळ
पथा सूर्य देवाचीया
यंत्रदर्शक मोजीत !

चरें जीवन, सरतें
क्षणीं खेळतां खेळतां
दैव नाचूनिया गातें :
" खेळूं झिम्मा ग आतां ! "

प्रेम जगांत दावणें
अर्थ जोडणें घरांत
वंशवेल वाढवून
जगा सोडावें रडत

विश्व पसाऱ्यांत ठेवा
करा घरकूल उभें
कां तें सोडूनिया जाता
गावें चिरंजिवा गाणें ?

२२–३–५५

छिद्रांमधुनी कितीक मुंग्या
अंतर कापुन आल्या गेल्या
परंतु माशा जाळ्यामध्ये
घोंगावुनिया कितीक मेल्या !

खाली धोपट चाकोरी पण
वरती उडता जाळीं दिसतीं
किंवा अवचित अज्ञातांतुन
अचूक हृदया बाण भेदिती

मूकपणाने मार्ग क्रमिता
जीवनसाथी मिळती सगळे
गुंजन करतां गूढ मनाशीं
टिपून मरती क्षणांत बगळे

१३–५–'५५

कुठे शोधणें चालणें किती
असाध्य दुर्गम दर्शन तव गे
मीच म्हणावें अनुभव नसता
कां 'अहमिन्द्रो न पराजिग्ये?'

सोम वसेना यत्र कुठेही
तत्र आणखी भद्र दिसेना
अनंतांतल्या त्या दिव्याची
साक्षी जगतीं कुठे पटेना!

अवचित रेषा अन् काळाची
क्षण भेदुनी जातां मजला
माझ्यामधला 'त्वं' येवोनी
विश्वामध्ये उभा ठाकला

एक पळांतचि अनंतांतल्या
नव्या जाणिवें दृष्टि बदलते
लक्ष्य भासतें दुजेंच कांही
असेंच केव्हा केव्हा होतें.

३१-१०-५६

भरली पिशवी खाली होता
डोळ्यांमधला नखरा गेला
पेल्यापेल्यांतून व्यथेच्या
घोटासाठी ओठ कांपला

हिरवट झाल्या भावकडांना
उगीच खुपतें पिवळें पाणी
आसुसलेल्या रातकिड्यांना
जशी सलावी शिसवी राणी

जागजागला राम-पहारा
साकल्याविन स्वप्निल जीवन
ठाव कुठे ना अभिमन्यूचा
शीळ विराली चक्रें पाहुन

कडाकडाने विश्वाच्या या
चालत राहुन पुनीत व्हावें
भगीरथाच्या परिश्रमाचें
मूकपणाने श्राद्ध करावें

जन्मस्थानीं विरलीं स्वप्नें
ओल्या दृष्टीची ही करणी

हिरवट झाल्या भावकडांना
उगीच खुपतें पिवळें पाणी
........पिवळें पाणी !

४-११-५८

दोन उभे निष्पर्ण ऋषि
वखवखलेल्या गांवशिवारीं

चादण्यांतली ढवळी सर्पिण
कधीच त्यांना डसली होती !
स्निग्ध पाउली बुचड्यामधुनीं
चमचमणारी स्वर्गफुलांची
मातींत भुतें उतरत होतीं;
गुहेमधली केसाळ भुतीण
तप्तालिंगन देतच होती–
हपापलेले चार डोळे
लपून सारे पीतच होते
डोळे मिटून चाटीत होते !

झटकन् पळे प्रकाश फटिंतुन
पाठीमागुन झडप उघडले
गर्मी थुंकुन वारें शीतळ
हळूंच पांघरुणांत शिरलें–
दोन सांपळे उभ्याउभ्याने
जळून तेव्हा खाक जाहले;
एक मेनका अनंतविश्वा

फळवित आली क्षणाक्षणांतुन
तिच्या उबेने जगलेले
दोन ऋषि उभे घेउनी
अस्मानाची डोक्यावरती
चविष्ट गोधडी !

१५-११-५८

नसलें कांही जर लपवाया
उगाच चंबू तोंडाचा कां ?
जलांत कां अन् नयनांचें घर
रुळतें पाउल स्वप्निल कां ?

तूंच पाजिलें होतें अमृत
धीट व्यथेच्या पेल्यामधुनी
एकांतामधि आणि तृप्तिचा
तूंच जाळिला कापुर मंथुनी

नको ऐकवूं, नकोस ऐकूं
बोल आज पण पडती उघडे
शब्दाविन जर इथे वेदना
दुसरें त्यां मुख जरा फुटूं दे.

२३–११–५८

तुला नि मजला गांव आहे
तूं राणी मी राव आहें
कणाकणावर ज्ञाताच्या
दोघांचेंहि नांव आहे!

शाश्वताचा ठाव आहे
अशाश्वताला भाव आहे
जीवनाच्या चविष्ट मौजा
बघणाराहि साव आहे.

संतलोकां साज आहे
बुद्धाची पण लाज आहे
जगांतील अन् जीवांना
युद्धाची पण खाज आहे

मनामध्ये राम आहे
जनामधेहि राम आहे
अंतीं तोंडीं लोकांच्या
राम जयजय राम आहे

*(तारी तारी रे रामराया)*

तारणारी भूक आहे
भोगालाहि सूज आहे

चोर मनाच्या कप्प्यावरती
धुरकट थोडी छूत आहे!

डोक्यांत वेडी झांज आहे
रखेल करुणा वांझ आहे
झपाटलेल्या डोळ्यांमध्ये
तरल बहिरी सांज आहे!

संध्येनंतर रात्र आणि
रात्रीनंतर सकाळ आहे
कणाकणावर ज्ञाताच्या
दोघांचेंहि नांव आहे
दोघांचेंहि गांव आहे!

२६-११-५८

अनुक्रम ...३५३६९....... वि: ......८१०५
—२२— ......९५३५...... नो० वि० ...२२-९१

निळ्या भयंकर चषकामधुनी
तेजोमदिरा प्राशित
धावधावलों दोघे आपण
हिरवीं पातीं चुंबित
आकाशाचें शुभ्र शिखर
पाहिजेच ना जिंकायाला

आणि म्हणालों सखे तुला—
मार्ग आपुला विभवाचा
हेतू अपुले एफेल् टॉवर,
लाजवणारे स्वर्गाला
स्वप्न बिलोरी अपुलें

तूं म्हणालिस—
वातावरणा भोक पाडुनी
क्रेन मृत्युचा उचलुन देइल
अपुल्या प्रेता पुरण्यास्तव
आकाशाच्या निळ्या करीं;
झिरपत राहिल सूर्य हाच
चंद्रहि असेल फिक्कट रडवा
हिरवळ सारी राहिल तीच

राहिल असाच मानव रे
आणिक त्याचा परमेश्वर
जाणारे ते आपण फक्त!

मी म्हणालों–
प्राणां अपुल्या शरीर दुसरें
घोट तोच पण ओठ निराळे
भाव हेच पण सखे निराळीं
त्यां स्रवणारीं स्वप्निल नयनें

तूं म्हणालिस–
रे पण सखया
तूं नच त्याचा प्रेक्षक
उरणार न तूं त्याचा कल्पक
तत्त्वज्ञानें सारी भंपक

तूं हसलिस, मीं हसलों
आणि म्हणालों–
स्मित हास्याचें पाउल टाकित
निघून जा पण बोलुं नको
कल्पन वस्त्र दैव वापरी
जीर्ण होउनी उसवलेंच जर
तर उसवूं दे

कुणास दिसला हसरा मृत्यु
जग रडकें, तो सडका !

हसलों तुज मी बिलगुन चटकन्
तूंहि हसलिस खुदकन्
आकाशाचें शुभ्र शिखर
पायाखाली पाहुन !

२-१२-५८

क्षितिज चाटतो भकास झेब्रा
फिक्कट मुखहि दिवस लपवितो
मूक वनाची हुळहुळ पाहुन
प्रीत हरवली झाड शोधितो

घटना रेषा काळ जमवितो
'अमर भूत' चें निर्मी भारत
तेंच घोकितो जखखड जंगल
फुंकर घालित....
दहनाचा पण ओला घाव
पळणाऱ्याचा ध्यानी कावा
दावेदार उगिच शोधितो
महाभारतीं अंडें घोळित !

निष्पर्णाचें कुब्बड जीवन
नयनां झाकुन क्रीडा बघतें
काठावरची, मैथुन चिंतित
जुनाट हिरवी प्रीत शोधितें.

शांत जळीं जरि प्रियतमछाया
हळवी लतिका लाजे पाहुन
प्रीत शोधितो झाड अजुनहि
मूक वनाची हुळहुळ घेउन !

४-१२-५८

स्थिर रात्रीच्या मस्त महालीं
आकाशीचा कुबेर मिस्किल
रत्नें दावी हासुन गालीं

एक मिळविण्या रत्न अमोलिक
नग्न नाचली हिरवी सृष्टी
गाणें गातच :

“ रे जळणाऱ्या
इब्राहिमला
वांचविण्यास्तव
ईश्वरनिर्मित
मी चिरउपवन
हिरवें जीवन ! ”

गगन हासलें गीता ऐकुन
प्रसन्न होउन !

हजार बाहू सृष्टि पसरवी
आलिंगाया गगनाला
शरीर सारें पाज म्हणालें
स्वर्गीची ती माया
परंतु घडलें अवचित कांही–

एक फेंकुनी रत्न धरेवर
चंद्रकलेस्तव हासुन वळलें
गगन....!
वसुंधरेचें नृत्य संपलें
करांत उल्का जळकी पाहुन
नयनांमधल्या अश्रुबिंदुसह
छाताडांतिल कलथें मन !

अजुन परंतु कधी कधी ती
गस्त घालिते हळवी सृष्टी
स्थिर रात्रीच्या मस्त महालीं
आशा हृदयीं वेडी घेउन

८-१२-५८

अविनाशी मन पिसाट माझें
अडलें क्षणभर
गे तूं जेव्हा
हिरव्या हसऱ्या काठावरती थांबविलें !

गवळी सूर विश्व राखितो
त्या तालावर
झुलत्या हळव्या वायूसंगे
नृत्यमग्न तव पवळी कांती
म्हणशी नयनां मिटुनी
ओढुन मजला जवळी,
" नाच नाच रे पेंद्या अविरत
कान्हा जोवर अपुल्यामध्ये "
हेरतांच तो हतदिन
थांबतेस तूं
अविनाशी मन पिसाट माझें
अडतें क्षणभर !

निळ्या महालीं तूं जातां
अभिनव दर्शन आत्म्याचें
घडवुन देण्या शरीरास तव

दुर्भाग्यासह शेकत बसतों
उदास विपरित जीवन ज्याचें
विध्वंसित त्या विश्वासह मी;
झोडित गप्पा निर्वाणाच्या
ईशभक्तिच्या
आठव ये पण "स्थितप्रज्ञ कीं
समाधिस्त, वा
तूं पर-रत" ची
तळमळ पाहुन हतभाग्याची
तर्क थांबतो,
अविनाशी मन पिसाट माझें
अडतें क्षणभर !

उगी म्हणावें वाटतसें पण
चोरमनांतील चोराला
"त्या गोंद्यासम पेंद्या राधे"
कुरुक्षेत्र पण स्वप्नीं येउन
शरीरांतलें रक्त गोठतें
अविनाशी मन पिसाट माझें
अडतें क्षणभर !

ओरडतों मी जेव्हा राधे
"तूं फसलिस अन् अनया फसला

(मी अविनाशी पिसाट काळ
खुळें बनविलें मजला कोणी?)
शरीरांतला आत्मा ठरतो
शरीरासहि अगम्य ज्यास्तव
द्वंद्वछंद तो मायिक निर्गुन
कान्हा दडतो त्याच्या मागे
शरणागतिचा मार्ग रोधुनी"
ऐकुन तेव्हा मागे फिरते
रडकी राधा!
वस्त्रां हुडकित नग्न नाचते
नाचनाचुनी लोळण घेते
पाचोळ्यावर, पतिचरणावर
पति–पत्नींचें मीलन देखुन,
हसणारें मुख गुप्त पाहुनी
अविनाशी मन पिसाट माझें
अडलें क्षणभर
रडलें क्षणभर
रे तूं जेव्हा
हिरव्या हसऱ्या कांठावरती थांबविलें

३०-१२-५८

तमसागर अन् तोच किनारा
जेथ वायुचें श्वसन चावरें
आठवतो कां, व्योम कपोली
झांकळलेली निळी झिलाई
प्रणयोन्मेषहि मोहरलेला
आशापुष्पें बावरलेलीं
साक्षी ठेवुन जिथे लाविलें
दाहकतेवर पिवळ्या मलमा
तूंच तूंच ग ऽ!

लहरीवाचुन भयाण शांती
अथांग खोली भावमनाची
पाहुन हर्षित, आठवते कां
नुक्तिच न्हाली पर्वतराजी
डुंबडुंबली दावित अपुल्या
फुगीरता द्वय स्निग्ध स्तनांची
मांड्यांची पण कोरिवता अन्
भुरकट खोऱ्यांची नवलाई
मखमाली लव शरिरावरची
शहारलेली ;

मज दिसतें जें स्मरतच नाही
तुज तें जीवन, अभिनव दर्शन !
रेखिव घाटच सौंदर्याचा
अथांगतेमधि काळतमाच्या
बुडून जाइल असें वाटतें
खरेंच कां तुज ?

तूं झालिस गे जरी अपर्णा
आठवतों मी तोच किनारा
बनुन दिवाणा, परंतु सखये–
कठीण आहे तुझी साधना
कठोर ग ऽ !

८-२-५९

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३५३६९ वि:
क्रमांक नों दि–२७-१२-७८

उंच ताठला ताड म्हणाला
बुटकी फिक्कट बघुन पालवी :
"नील नभाच्या भिंतीमागे
दडला बरं का अरूप भिउनी
मीच बारसें काल जेवलों
कुठला गे तो देव अनादी
अविनाशीपण भंपक त्याचें
बाराव्याचें घेइन जेवण!"

हपापलेली वदे पालवी :
"इच्छा नसतां आलेली मी
गूढ भाविवर अवलंबित रे
इच्छा नसतां पण जाणारी,
विरक्त घन मज नित उपदेशी
समीरहि जो सभ्य वाटला
तोहि तर रे अपुलीं स्तोत्रें
गा म्हणतो मज आमिष दाउन!"

कडवट तोंडीं ताड उत्तरें :
"शिवाशिवी अन् दलालबाजी
तुला कशाला अध्यात्माची

तूं अस येथे, तो अस्मानी!"

हिरमुसलेली वदे पालवी :
"खरेंच का मी भाव शोधितें
अभावांतुनी, पिळीत मानस,
कीं तूं अस्सल खराच प्रेषित?"

—"नकोच हृदया हीहि भावना
नित्य ठकविशी तूंच मला रे
दमलेली मी, मलाच शोधित
राहिन संतत हपापलेली—
झपाटलेली."

९-२-५९

नखशिखान्त तूं नटली होतिस
मोलच नव्हतें तव साजाला
इतिहासाची किमया सारी
त्यासाठी तर झटली होती,
तुझें परंतु हृदय नाटकी
प्रदर्शनास्तव हपापलेलें
हिरमुसलेलें !

नग्न सृष्टीचें नूतन बालक
विश्वाकार तुझी आकृति
भव्योदात्त तुझी नग्नता
घडिवलेली विधिकरांनी
पण वस्त्रांकित,
हवा कशाला तुज हा मेकप्
तुझेंच असतां मन दुःशासन
कृष्ण कोणता येइल धावुन,
मुलूखाची तूं खट्याळ आणिक
तुझें खरोखर हृदय नाटकी !

६-७-५१

काल वाटलें असें घडावें
कांहीं तरि पण घडलें आज
नापिश्तिमचें खुळें कबूतर
येउन म्हणतें पाणी पाज

भेट आजच्या कडु नाक्यावर
काल उद्यांची चुकेल म्हणुनी
ॲचेलिसाहि रेस पाहतो
थक्क होउनी ! थक्क होउनि !!

काल आजची नसे संगती
आज उद्यांची कां लागावी ?
घाटावरती जळणाऱ्याला
लाज जगाची कशास यावी ?

काल उद्यांच्या सीमेवरचा
डंख वाटतो सुखद उपाधी
कधी लागणें जगास असल्या
शांत निरामय दगड-समाधी

१३-७-५९

अजून आहे काळी धुंदी
हिरव्या पानांच्या डोळ्यांत
पाणी प्यालया पंखांनी रे
कसें मापणें नीलाकाश?

दंतकथेपरि झालें जीवन
मरणें आलें मेल्यावरती
दैवीं बघणें दिव्याकाशा
थिजलेल्या अन् या डोळ्यांनीं

किती जपूं मी मनांत थकल्या
शांत व्यथेचें भरलें मोहळ
आकाशीं तर उठलें आहे
कल्पांतीचें अंतिम वादळ

२७-७-५९

तुझ्या डोळ्यांना सवय आहे
मदनशर प्रसवण्याची
हृदयांना विद्ध करण्याची
थांबवून शरावली
स्वत्व हरपून टाकण्याची
जगांतून उठविण्याची
भिवयांची कोर दाखवून
नंतर जगविण्याची, सवय आहे तुला!

तुझ्या डोळ्यांना सवय आहे
तमव्याप्त दिशा पाजळण्याची
पण त्या तेजाच्या सागरांत
माझ्या "मी"च्या प्रकाशकणाला
रिझविण्याची
नाही फक्त तेवढीच रीत!

१–११–५९

आज तमव्याप्त दिशा
सौधावरून पळतें जग दिसणार नाही
हिरव्या तरुराजीची साडी नेसून
साकारणार नाहीत नाचणारे वारे
आकारणार नाही प्रीतीमधली व्याकुळता
व्यथेंत रंग भरणार नाही
दिसणार नाहीत तुझ्या पाउलखुणा....सख्या--
आज तमव्याप्त दिशा-

आज तमव्याप्त दिशा
कुस्करूं कां शरीर काल तापलेलें
स्मृतींत आवेग उरला नाही आज;
कशाला वाजंत्र्या प्रेताच्या यात्रेस
जरीकाठी कफन....आभासाला....
उरला नाही आधार
उघडा झाला आहे आकाश-द्रोण
विस्कटलेल्या केशजालांतुन
कसें बघूं तुज सुकल्या नेत्रांनी
त्यांना ही तर चढली आहे....सख्या
आज तमव्याप्त निशा!

३-१२-५९

हवीच होतिस तूं मज सुंदर....जिवंत स्वप्न
अमर्याद अवकाशाच्या प्रांगणांत
दिक्‌वस्त्रें लेवून धुंद नाचणारी
प्रीतवेडी मूर्त मुग्ध चर्मचक्षूंस व्यक्त बहरलेली, नवतींत
हवी होतीस तू !

हवी आहेस आज तू....
अज्ञाताचा ध्यास
पालवणारी,
मृत्यूला कवटाळण्यास अधीर मी
पण जाणीव आहे जित भावनेची
हरिणपाउस मन, तुझ्या लावण्य कळेने
यावी विस्मृति....आशा....व्यापावा निःशब्दतेने
अन् निवारा तुझा मृत्युच्या छायेंत
आतां हवा आहे मला !

३-१२-५९

चुकार येथे काळच आलों
बघितलें विस्तीर्ण आकाश
त्या खालचें विश्व फुललेलें
विधिरचना !
आश्चर्यानें मुग्ध होऊन
वेडावलों रडणें विसरून
हालविले मोदातिशयाने हात नि पाय
आणि चित्कारलों कांही तरी
संभ्रमित, जें कूट कवन
मानवतेचें !

काळच आलों येथे चुकून
आणिक कांही
रुखरुखलें रित्या मनाच्या
गाभाऱ्यांत 'चूक चूक' करून
मुसमुसलीं डोळ्यांचीं टपोर पुष्पें
शीताश्रूंचें सिंचन करून
उन्मळले आधार, जाऊन
गीतांची लय
लक्ष्य स्थानाचा ज्ञात पत्ता
चुकला विस्मृतीच्या रेताडांत

रक्ताळलेले ओठ मुकाट
पुटपुटले
नव्या जगाचें कुण्या भविष्य
विगलितांचें कफन–गीत
गीत मानव्याचें चिरंतन !

आलों चुकून येथे कालच
थोडें हंसलों, रडलों थोडें
शिकलों कांही, कांही भकलों
इतिहासाचा गुंता भेसुर
कोडें गहन नाकळणारें
दिक्कालांच्या झिज्यांतील
धडपड....धडपड केविलवाणी
चक्रवाक्सम
श्रेयस् प्रियेच्या शोधांत
लक्ष्य अवचित तेव्हा झालों
नियतीच्या कीं कालशरांचें
शापवाणीच्या प्रसवाच्या पण
नाहीत 'आज' ला लागल्या वेणा !

चुकार येथे कालच आलों
थंडावलों विश्वाकार निश्चलतेने
विसरलों तम–प्रकाशभेद

पुढील दशा ज्ञात नाही
भविष्यपथ प्रश्नाकार
समर्पणाचा गळका चोरभाव
आहे रक्ताळवीत पायाचीं बोटें
तेवताहे एकच इच्छादीप
जायचें आहे येंथून उद्या
पुनः जाण्यासाठी कुठे तरी चुकून !

९-१२-५९

मी प्याले रे निसर्गमधुघट
आणि बाधली हिरवळ–करणी
आता कशाला बात घराची
जीवन जेथिल चरतें मरणीं

भुकेस गेला तडा भयंकर
खोल मनांतिल आणि व्यथांचें
आकाशाला दिसतें मोहळ
जगण्यासाठी एक एलिक्झिर !

तरी हवी मज प्रीत तुझी रे;
मी मेल्यावर
खळखळणाऱ्या
अवखळ निर्झर कांठावरती
मोहरणारे निसर्गमंदिर
मूर्तीच दिसतें आता मजला–
अपूर्त स्मारक तुझ्या प्रीतिचें !

लाख लाख तव स्वप्नांमध्ये
अस्पर्शित मज अशीच असुं दे
गुणवैभव तव काय करूं ? मी
अलिखित कविता निसर्ग–दंशित !

१०–७–६०


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

अनुक्रम ३५...... वि: ......
क्रमांक ...... दि: ......

मला न दिसला न्याय कुठेहि
तुला ,तरी पण दिसला काय ?
जेरीमियाला वळला नाही
तुला तरी पण कळला काय ?

इकडे जोखड तिकडे रक्त
इकडे अश्रु, अश्रु तिकडे
मानवतेचा पंथ अनामिक
अश्रूंची ही यात्रा आहे !

जीवन म्हणजे कूटप्रश्न, मज
कळतें आहे मरणें आहे
अनंतांतल्या उद्यांत विरण्या
एकच तडफड घाई आहे

२२–८–६०

अभिसाराची तुटली वीणा
शापित माझी रात्र संपली
क्षण विरहाची सकाळ घेउन
आगंतुक ये सूर्य पारखी !

जीवन करण्या सुफलित सम्मुख
सुहासनयना हविशी होतिस
मद्भावांच्या उधळुन राशी
राहिलीस तूं विन्मुख निष्फल !

अचिर मधुर तव ध्यानामध्ये
मौन वेचलें उन्मेषांनी
शरीर जेव्हा वठलें पिकलें
उरली केवळ आस क्षणांची

अभिसाराची तुटली वीणा
विच्छेदित ही रात्र संपली
चिरविरहाची सकाळ घ्यालों
प्रेमळ माझा सूर्य पारखी !

११–११–६०

तुझ्याभोवती फेरा धरला
असह्य उरली शरीरांत कळ
वांगीं माझ्या परसामधलीं
नकळत धरिती उगीच गे फळ!

स्वप्नामधल्या मीलनासहि
क्षण सृजनाचे शाप मिळावे
कां न तुझ्या अन् विन्मुखतेवर
मम ध्यासाचें फूल फुलावें?

१५-११-६०

चराचराच्या जननगतीचें गुह्य
अजून अचल.
वैश्विक भंगुरत्व त्यांत मिसळलेलें
अवकाशाचा तट फोडून
एक स्फिंक्स माझ्यापुढे उभा ठाकला
मूर्ति त्याची होती अंधुक
प्रेमावेग लज्जांकित जणूं!
पापण्याआड थरारणाऱ्या
अग्निज्योती भडकत होत्या,
कठोर स्मित विलसत होतें
पाषाणमुखावर
ज्यांतून होता कधी निघाला
पापनाशक "मसीह" ध्वनि.

दाखवून मज : निरर्थ पोकळ
अवकाशाची अमर्यादता;
क्षणांत त्यजुनी पृथ्वीगोलां
निळावंतिमधि हरवणाऱ्या
घरट्यामधल्या द्विजगणांची
क्षुद्र अहंता,
विचारिलें मज–

" विकसित ज्ञानवृद्धोंची क्षमता
अटल अपरिहार्य
रक्षिल काय विध्वंसापासून
परिणामांची जाणीव
घडविल काय पश्चात्ताप
पोकळ भ्रामक अहंतेंत
जाणीवहि बोथटेल कां
या विनाशी शरीरांतली
क्षुद्र अहंता
विश्ववृत्तीच्या संचाराचा
कापणार नाही काय....गळा "?

या यक्षप्रश्नाचें
नाही सुचत अंधुक उत्तर सुद्धा
मेंदूचीं कवाडें उघडीं, उपडीं
स्मरणानेच सायलीनसच्या
हाय झालें माझें काळीज
चेतनाहीन सुवर्ण

१९-११-६०

माझ्यासाठी तुवा जरी
ठेविलेस रिक्त माठ
दिलेस माझें करून
ओले पापण्यांचे ओठ

माझा आठवेना मज
तुझ्यामुळे भूतकाळ
माझ्या रोख भविष्याचा
तुला कसा घडा पाठ?

सखे माझ्या पटावर
शिंपिलीस काळी शाई
तुझ्या लावून साडीला
प्रकाशाचे जरीकाठ

माझी तुला ना गरज
नको ठेवूं खुलें दार
माझ्यासाठी देवाजीचा
सज्ज आहे गोदाकांठ

२५-११-६०

होतीस सुंदर
नव्हतें ज्ञात मला
ओठींचा मधुघट
दिसलाच नाही,
मुखावरील भाव
उमगला नाही,
मापूं शकलों नाही
हृदयाची खोली,
मोजली नाही
स्नेहाची मर्यादा,
प्रेमाची रीत
सांद्रता नेत्रीची
न्हालों जिच्यांत
समजली नाही
उमजली नाही.

२८-११-६०

मला वाटतें छान जगावें
दैवी नसता
स्थितींत असल्या सूख मानणें
जमतें ना मज
मानवतेच्या कर्तृत्वावर
विश्वसतों मी अजून
आयुष्याचा म्हणून मजला
प्रत्येक क्षण
नवा आहे, हवा आहे
गूढ मृत्युचें आवाहन तें
आव्हानच,
परंतु मजला हवें वाटतें
जीवनमोलहि देउन घ्यावें
असें वाटतें.

जीं न कुठे हीं कुणी दैवतें
निर्मियलीं वा इथे पूजिलीं
मला हवीं तीं स्वप्नें
कुणालाहि ना कधी मिळालें
तें मानवपद

मला हवें तें सारें
चुकून मिळविण्या असें आगळें
पुढे कधी तरि जीवन जगण्या
मला वाटतें छान मरावें
दैवी नसुनी तेंहि
वाट पाहतो अजून!

५-१२-६०

सौंदर्यकळी तूं फुलतां, फुलतिल
पुष्पें उधळित जीवन-गंधा
विळख्यांमधली सुधा वारुणी
तुजवर शिंपिल वसंत वेडा

येतिल घोळत शब्द कवींचे
गहिऱ्या नयनीं शोधत कांही
निर्वसनाही करील तुजला
शिल्पकार नभ तुझा पुजारी

विश्व तुझें; गे तुलाच ठावी
मानवतेच्या व्यथा आइची
तव चरणांवर पण अर्पाया
देवा जवळी कांही नाही !

१४-२-६१

होता अंधार भरून
आंधळा काल कोपरा
नकटे डोळे मिटून
सागरपिल्लं उद्याचें
तिथेच लपलें होतें

तिथेंच लपलें होतें
रोप लाजरें काल
होतीं लदलीं रसाळ
लुसलुस वेदीवरचीं
शबरीचीं गोड फळें

शबरीचीं गोड फळें
तोंड काळें कडसर
जिभल्या चाटुन पाही
रामाची प्रतिमा गोरी
नाही अंधार आंधळा!

२०-२-६१

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36362 ....... वि: ..................
क्रमांक ............. नों: दि: 22-7-61

सडे सान्तजल अनंतांतळें
गगनतडागीं, अनंत उठती
नक्षत्रांचे चीड बुडबुडे
फुगत आहेत, आहेत फुटत
पृथ्वीचा का उद्यास फुटणें?

निळें वस्त्र हा पांघरलेला
निजला तर नाही मुचकुंद इथे
नकोस मारूं लाथ, नव्हे तो
अशोक, नाहिस पुष्पवती तूं
नकोस छेडूं जानकीस या
अशोकवनावर उडे मारुती
समर्थ चुकुनच रामबाण तो
असेल आजहि, कुणास ठावा

नीलकंठ का तपोमग्न हा –
भंगूं नको तूं रुद्रतपाला
तारक आजच तवांतरीचा
असुर भेसुर झालेला पण
तव पक्षाचा भस्म व्हावया
कुणीच नाही तुझ्यावाचुनी!

हरवलेस तूं वेद चारही
हयग्रीव तो कधी उगवणें
या तमसागर क्षितिजाआडुन
ढवळुन देण्या अनंतांतली
अथांग येथिल कुठी सान्तता
पसरून ठेव दान घ्यावयास हात फक्त तूं
आणि सडूं दे गगनतडागीं
सडे सान्तजल अनंतांतलें

२-३-६१

REFBK-0012707
REFBK-0012707
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों: वि: ......
मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. क्र. 92606
शाखा